महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसुचना/ ९० /२०२३ दि. १३/०६/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील व डोंबिवली वाहतूक उप विभागाच्या हद्दीतील मानकोली–मोठागाव उड्डाणपूल वाहतुकीकरीता लवकरच खुला करण्यात येणार आहे. सदर रस्ता सुरू झाल्यानंतर भिवंडी–ठाणे ते डोंबिवली असा मार्ग जवळचा असल्याने त्या मार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक सुरू होणार आहे. तसेच डोंबिवली शहरात अरूंद रस्ते असून सद्यस्थितीत जड, अवजड वाहनांची वाहतूक सुरू झाल्यास नमूद मार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वामी नारायण सिटी चौक, मोठागाव ते दिनदयाळ चौक, डोंबिवली पश्चिम या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या रस्त्यावर कोणत्याही प्रकारची वाहने उभी करण्यास मनाई करणे व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक असल्याचे याबाबतचे प्रत्यक्ष पाहणीत आढळून आले असून असे न केल्यास लहान–मोठे अपघात होऊन जिवीत व वित्तहानी होण्याची स्थिती निर्माण होईल. तसेच प्रसंगी आपत्कालीन परिस्थितीत वाहतूक कोंडी सोडविणे व अपघातग्रस्तांना मदत पुरविणे याकरीता मोठया समस्या व अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्किंग** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड**, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/मीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

| अ.क्र. | नो पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | स्वामी नारायण सिटी चौक ते रेतीबंदर चौक, डोंबिवली पश्चिम दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | ७४० मीटर | २४ तास |
| २ | रेतीबंदर चौक ते सम्राट चौक, दिनदयाळ चौक, डोंबिवली पश्चिम दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | १५०० मीटर | २४ तास |

**टिप** :– सदरची वाहतूक अधिसुचना मानकोली–मोठागाव रस्ता वाहतुकीकरीता खुला करण्यात आलेल्या दिनांकापासून अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner